**MHKO100009742023**

_

## <u>रे.क.नं. १९५/२०२३ मधील निशाणी क्र. २६ वरील आदेश</u>
## (पार्वती खांडेकर वि. शिवाजी खांडेकर)

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१५ शिवाजी लक्ष्मण बुगडे व प्रतिवादी क्र.१६ रामचंद्र धोंडीबा यडूरकर यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१५ हे दिनांक २६/०६/२०२१ रोजी मयत झाले असून प्रतिवादी क्र. १६ हे दिनांक ०६/१०/२०१४ रोजी मयत झाले आहेत. दावा दाखल करण्यापुर्वी प्रतिवादी क्र.१५ व प्रतिवादी क्र.१६ हे मयत झाले होते यांची माहिती त्यांना नव्हती. प्रस्तुत कामाची नोटीस त्यांना लागू करण्यासाठी गेल्यानंतर सदरची बाब वादी यांना समजून आली. प्रतिवादी क्र.१५ व १६ यांचे मृत्यूदाखले वेळेत मिळाले नाहीत. प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून विलंब केलेला नाही. सदरचा वाद स्थावर मिळकतीसंदर्भातील असल्याने विलंब माफ अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर झालेस वादी यांना न्यायहक्कापासून वंचित रहावे लागणार आहे. सबब प्रतिवादी क्र.१५ व प्रतिवादी क्र. १६ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून वारस रेकॉर्डवर घेणेची विनंती केली आहे.

**२.**　　　प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जातील कारणे चुकीची आहेत. वादी यांना प्रतिवादी मयत झालेबाबत कल्पना असताना देखील हेतुपुरस्कर तजवीज करण्यास विलंब केलेला आहे. वादीचा अर्ज न्यायाचे कारणास्तव मंजूर केल्यास कॉस्ट बसवणेत यावी.

**३.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

**४.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हद्दी निश्चीत होवून व फिल्ड पाडून मिळणेकरीता व कायम मनाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१५ व प्रतिवादी क्र.१६ यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. निशाणी क्र.१० कडील बेलीफ अहवालाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१५ दोन वर्षापुर्वी मयत झालेचे त्यांचे मुलाने सांगितलेचे दिसून येते. निशाणी क्र.१३ कडील बेलीफ अहवालाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१६ हे सन २०११ साली मयत झालेचे त्याच्या मुलाने सांगितलेचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१५ व प्रतिवादी १६ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यास दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र.१५ व प्रतिवादी १६ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये चारशे मात्र) खर्चादाखल देणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.10.14 17:38:29 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १४/१०/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज